**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:- अतिका-५६२३/प्र.क्र.१६७/नवि-२७**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुबई-४०००३२**
**दिनांक २६ मे, २०२३.**

**वाचा:-** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.२०८/कार्या.-१२, दि.०५.०९.२०१८.

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ५६ नुसार शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे त्यांच्या स्वत:च्या पदाव्यतिरिक्त दुसऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येतो. अनेक वेळा योग्य सेवाज्येष्ठ व अनुभवी व्यक्तींना अतिरिक्त कार्यभार देताना डावलेले जाते व त्यामुळे प्रशासनास अपेक्षित लाभ मिळत नाही या बाबी विचारात घेता, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.२०८/कार्या.१२, दि.०५.०९.२०१८ अन्वये अतिरिक्त कार्यभार सोपविताना विचारात घ्यावयाच्या मार्गदर्शक सूचना विहित केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयातील गट- "अ" व गट-"ब" (राजपत्रित) या पदांच्या बाबतीत अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी पुढीलप्रमाणे सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | पद रिक्ततेचे कारण | संवर्ग | अतिरिक्त कार्यभार सोपविण्यास सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १. | बदली / पदोन्नती / सेवानिवृत्ती | गट-"अ" | सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (नवि-१) |
| २. | रजा | गट-"अ" | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे (सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग यांच्या पूर्व मान्यतेने) |
| ३. | बदली / पदोन्नती / सेवानिवृत्ती / रजा | गट-"ब" (राजपत्रित) | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे. |

२. उपरोक्त प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचे स्तरावरुन अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबतची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात यावी.

२.१ गट-"अ" संवर्गातील बदली, पदोन्नती, सेवानिवृत्ती व अन्य कारणांमुळे (रजा कारणास्तव रिक्त झालेली पदे वगळून) रिक्त होणाऱ्या पदांबाबत अतिरिक्त कार्यभाराचे आदेश शासनस्तरावरुन निर्गमित करण्यात येतील.

२.२ सद्य:स्थितीत शासन मान्यते शिवाय ज्या ज्या ठिकाणी अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आले आहेत त्या-त्या ठिकाणी या परिपत्रकातील सूचनांनुसार अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासंदर्भात शासनाचे आदेश घेण्यात यावेत.

२.३ गट-"अ" संवर्गातील अधिकारी रजेवर गेल्यामुळे रिक्त झालेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याची कार्यवाही संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग यांच्या पूर्व मान्यतेने करावी.

२.४ गट-ब (राजपत्रित) संवर्गातील बदली, पदोन्नती, सेवानिवृत्ती, रजा व अन्य कारणांमुळे रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याची कार्यवाही संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर करावी.

३. नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविताना सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक दि.०५.०९.२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांचे व सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(विजय चौधरी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागपूर.
८. संबंधित सर्व कोषागार अधिकारी.
९. निवडनस्ती / नवि-२७.